९८५

९८८

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११

# मुंबईचा औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५९

(दिनांक १६ जुलै, २००५ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. XI OF 1960**

# THE BOMBAY DRUGS (CONTROL) ACT, 1959

**(As modified upto the 16th July 2005)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रुपये ७.९० ]

S(H) 725

## मुंबईचा औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५९

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ ... | १ |
| २. | व्याख्या ... | १ |
| ३. | मद्यनिषेध व उत्पादनशुल्क आयुक्त ... | ३ |
| ४. | कलेक्टरचे अधिकार ... | ३ |
| ५. | या अधिनियमान्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यांवर आयुक्तांचे नियंत्रण ... | ३ |
| ६. | ज्या औषधिद्रव्यांस हा अधिनियम लागू असेल अशी औषधिद्रव्ये व अधिसूचित औषधिद्रव्ये. | ३ |
| ७. | अधिसूचित औषधिद्रव्यांच्या घाऊक व्यापाऱ्याच्या किंवा किरकोळ व्यापाऱ्याच्या धंद्याचे नियमन करणे. | ४ |
| ८. | किरकोळ व्यापाऱ्याने विक्री करणे ... | ४ |
| ९. | वैद्यक व्यवसायी व कलम १४ अन्वये अधिकृत केलेली व्यक्ती यांस विक्री करण्याचा व्यापाऱ्याचा अधिकार, वैद्यक व्यवसायीने विक्री करणे. | ४ |
| १०. | व्यापाऱ्याने करावयाच्या विक्रीचे कमाल परिमाण ... | ४ |
| ११. | लायसन दिलेल्या किरकोळ व्यापाऱ्याने व वैद्यक व्यवसायीने औषधीय कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी व चिकित्सापत्रानुसार असेल त्या व्यतिरिक्त अधिसूचित औषधिद्रव्य विकता कामा नये. | ५ |
| १२. | अधिसूचित औषधिद्रव्य ताब्यात ठेवण्याचे नियमन ... | ५ |
| १३. | अधिसूचित औषधिद्रव्याच्या वाहतुकीचे नियमन ... | ६ |
| १४. | विवक्षित व्यक्तींनी अधिसूचित औषधिद्रव्ये जवळ बाळगणे किंवा त्यांची वाहतूक करणे यांचे नियमन. | ६ |
| १५. | कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्याच्या वतीने अधिसूचित औषधिद्रव्य विकणे, ताब्यात ठेवणे व त्याची वाहतूक करणे. | ७ |
| १६. | नमुना म्हणून केलेली अधिसूचित औषधिद्रव्याची विक्री, वगैरेचे नियमन ... | ७ |
| १७. | विक्रीच्या बाबतीत विक्रीचे ज्ञापन देणे ... | ७ |
| १८. | लायसन वगैरे तहकूब किंवा रद्द करण्याचा अधिकार ... | ७ |
| १९. | तरतुदींचे पालन करण्यात कसूर करणे ... | ८ |
| २०. | माहिती मिळवण्याचा अधिकार ... | ९ |

अनुक्रमणिका--चालू


| | | | |
|---|---|---|---|
| २१. | शास्ती | ... | ९ |
| २२. | कंपन्यांना केलेले अपराध | ... | १० |
| २३. | अधिक शिक्षा देण्याचा फौजदारी न्यायाधीशाचा अधिकार | ... | १० |
| २४. | जप्त होण्यास पात्र असलेल्या वस्तू | ... | १० |
| २५. | जप्तीच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती | ... | ११ |
| २६. | निरीक्षक आणि कार्यपद्धती | ... | ११ |
| २७. | मंजुरीशिवाय खटला करता कामा नये | ... | १२ |
| २८. | झडती घेण्याचा व जप्ती करण्याचा अधिकार | ... | १२ |
| २९. | झडती घेण्याचा व खुल्या जागेत अधिसूचित औषधिद्रव्ये वगैरे जप्ती-करण्याचा अधिकार | | १२ |
| ३०. | झडती घेण्याची व जप्ती करण्याची कार्यपद्धती | ... | १२ |
| ३१. | लायसन दिलेल्या व्यापाऱ्याच्या जागेची तपासणी करण्याचा अधिकार | ... | १२ |
| ३२. | अपिले | ... | १३ |
| ३३. | फेरतपासणी | ... | १३ |
| ३४. | कारवाई करण्यास मनाई | ... | १४ |
| ३५. | त्रासदायक रीतीने प्रवेश करणे, झडती घेणे किंवा धरणे याबद्दल शिक्षा... | | १४ |
| ३६. | अधिकाऱ्यांविरुद्ध करावयाच्या खटल्यांची किंवा दाव्यांची मुदत | ... | १४ |
| ३७. | राज्य शासनाचे सर्वसाधारण अधिकार | ... | १४ |
| ३८. | अधिकार सोपविणे | ... | १५ |
| ३९. | ह्या अधिनियमाच्या तरतुदी राज्य शासनाच्या मालकीच्या अधिसूचित औषधिद्रव्यांना लागू नसणे. | | १५ |
| ४०. | नियम करण्याचा अधिकार | ... | १६ |
| ४१. | रद्द करणे व बचाव | ... | १७ |
| ४२. | इतर विधींचा बचाव | ... | १८ |

## सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११[1]

## [ मुंबईचा औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५९ ]

[राष्ट्रपती यांची ४ फेब्रुवारी १९६० रोजी संमती मिळाल्यानंतर, मुंबई राजपत्र भाग चार मध्ये दिनांक ९ फेब्रुवारी १९६० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०,

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ (१४-१-१९७४)*

**सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने विवक्षित औषधिद्रव्यांची विक्री करणे, ती जवळ बाळगणे, त्यांची वाहतूक करणे व त्यांचा उपयोग करणे यांवर नियंत्रण ठेवण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने, विवक्षित औषधिद्रव्यांची विक्री करणे, ती जवळ बाळगणे, त्यांची वाहतूक करणे व त्यांचा उपयोग करणे यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि इतर विवक्षित प्रयोजनाकरिता तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** (१) या अधिनियमास, मुंबईचा औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

(२) तो संपूर्ण [2][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

(३) तो, राज्य शासन राजपत्रात अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [3]दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-- व्याख्या.

(क) "कलेक्टर" या संज्ञेत, राज्य शासनाने ह्या अधिनियमान्वये कलेक्टरचे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालविण्यासाठी किंवा त्याची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये बजावण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ख) "व्यापारी" याचा अर्थ, लायसन दिलेला घाऊक व्यापारी किंवा लायसन दिलेला किरकोळ व्यापारी, असा आहे ;

[4][(ग) "आयुक्त" याचा अर्थ, मुंबई मद्यनिषेध अधिनियम, १९४९ अन्वये नियुक्त करण्यात आलेला आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क; आणि त्यामध्ये, राज्य शासन, या अधिनियमाखालील आयुक्ताचे सर्व किंवा कोणतेही अधिकार ज्याला प्रदान करील किंवा सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कामे ज्याच्याकडे सोपवील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होईल;] १९४९ चा मुंबई २५

---

1. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता मुंबई शासन राजपत्र, १९४८, भाग चार, पृष्ठ ४९७ (इंग्रजी) पहावे.
2. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वयें 'मुंबई राज्यास' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
3. १ जानेवारी १९६२ रोजी अंमलात आला [शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक बीडीसी-१०५९/३७५९६/तीन, दिनांक १८ नोव्हेंबर १९६१ पहा.]
4. सन १९७३ चा अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम ३ मधील अनुसूचीच्या खंड (३) द्वारे हा खंड दाखल करण्यात आला.

* ही खूण अधिनियमाचा प्रारंभीचा दिनांक दर्शविते.

(घ) "औषधिद्रव्य" याचा अर्थ, ज्या कोणत्याही औषधास किंवा पदार्थास हा अधिनियम लागू असल्याचे कलम ६, पोट-कलम (१) अन्वये जाहीर करण्यात झाले असेल असे (एक) मनुष्यांनी पोटात घ्यावयाचे किंवा बाहेरून लावावयाचे अथवा जनावरांस पोटात द्यावयाचे किंवा बाहेरून लावावयाचे औषध, किंवा (दोन) मनुष्यांच्या किंवा जनावरांच्या रोगाच्या उपचारांसाठी, तो बरा करण्यासाठी किंवा त्यास प्रतिबंध करण्यासाठी उपयोगात आणण्याचा इरादा असलेले पदार्थ, असा आहे;

(ङ) "कुटुंब" याचा अर्थ, एकाच घरातील व्यक्ती म्हणून सामान्यपणे एकत्र राहणाऱ्या व जेवण करणाऱ्या व्यक्तींचा गट असा आहे, परंतु त्यात नोकराचा समावेश होत नाही ;

(च) "लायसन दिलेला किरकोळ व्यापारी" याचा अर्थ, कलम ७ अन्वये दिलेले लायसन धारण करणारा किरकोळ व्यापारी असा आहे ;

(छ) "लायसन दिलेला घाऊक व्यापारी" याचा अर्थ, कलम ७ अन्वये दिलेले लायसन धारण करणारा घाऊक व्यापारी असा आहे ;

(ज) "वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, जी व्यक्ती वैद्यकशास्त्राच्या (यात शल्यचिकित्सा व सूतिकाशास्त्र यांचा समावेश होतो) कोणत्याही पद्धतीचा व्यवसाय करीत असेल आणि तत्कालीन अंमलात असलेल्या ज्या कोणत्याही विधिन्वये त्याला राज्यात व्यवसाय करण्याचा हक्क मिळत असेल अशा विधिन्वये ठेवलेल्या कोणत्याही नोंदणीपुस्तकात ज्याची नोंदणी करण्यात आली असेल किंवा अशा कोणत्याही यादीत ज्याची नोंद करण्यात आली असेल किंवा अन्यथा अशा कोणत्याही विधिन्वये किंवा तदनुसार ज्याला राज्यात व्यवसाय करण्याचा हक्क मिळाला असेल किंवा परवानगी मिळाली असेल अशी व्यक्ती असा आहे; आणि त्यात दंतवैद्याबाबत अधिनियम, १९४८ याच्या अर्थानुसार नोंदणी केलेला दंतवैद्य, तसेच **मुंबई पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५३ याच्या अर्थानुसार किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम विधीच्या अर्थानुसार नोंदणी केलेला पशुवैद्यक व्यवसायी, यांचा समावेश होतो ;

१९४८ चा १६.

१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६८.

(झ) "अधिसूचित औषधिद्रव्य" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम ६ अन्वये अधिसूचित औषधिद्रव्य असल्याचे अधिसूचित केले असेल असे औषधिद्रव्य असा आहे ;

(ञ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले, असा आहे;

(ट) "चिकित्सापत्र" याचा अर्थ, वैद्यक व्यवसायीने दिलेले चिकित्सापत्र, असा आहे;

(ठ) "किरकोळ व्यापारी" याचा अर्थ, जी व्यक्ती कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य घाऊक रीतीव्यतिरिक्त इतर कोणत्याही रीतीने विकण्याचा धंदा करीत असेल अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यात वैद्यक व्यवसायीचा समावेश होत नाही ; आणि "किरकोळीने विक्री करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल;

(ड) "राज्य" याचा अर्थ [1][महाराष्ट्र राज्य] असा आहे ;

---

** आता महाराष्ट्र पशुवैद्यक व्यवसायी अधिनियम, १९७१ (१९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९) पहा.

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० यान्वये "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(ढ) "वाहतूक करणे" याचा अर्थ, राज्यात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे, असा आहे ;

(ण) "घाऊक व्यापारी" याचा अर्थ, जी व्यक्ती फेरविक्रीच्या कारणांसाठी कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य विकण्याचा धंदा करीत असेल अशी व्यक्ती असा आहे ; आणि "घाऊक विक्री करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल.

मद्यनिषेध व उत्पादनशुल्क [१][आयुक्त]

**३.** [१][आयुक्त] राज्य शासनाच्या नियंत्रणास अधीन असेल आणि त्याने राज्य शासन, वेळोवेळी जे सामान्य किंवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून, या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा तदनुसार त्याजकडे सोपविलेले अधिकार चालविले पाहिजेत व तद्नुसार त्याजकडे सोपविलेली किंवा त्याजवर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत. तसेच त्याने या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत देखरेख ठेवली पाहिजे व त्याच्या तरतुदी सामान्यतः पार पाडल्या पाहिजेत.

कलेक्टरचे अधिकार.

**४.** (१) कलेक्टरने त्याच्या क्षेत्राधिकाराच्या हद्दीत ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वये किंवा तदनुसार दिलेले अधिकार चालविलेले पाहिजेत व त्याजकडे सोपविलेली किंवा त्याजवर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

(२) राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, ह्या अधिनियमान्वये किंवा तदनुसार कलेक्टरास नेमून दिलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार व नेमून दिलेली सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कामे कोणत्याही जिल्ह्यात किंवा ठिकाणी चालविण्यासाठी किंवा पार पाडण्यासाठी कलेक्टरव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस नेमण्याचा अधिकार आहे. अशा व्यक्तीवर [१][आयुक्ताच्या] व राज्य शासनाच्या नियंत्रणाखेरीज राज्य शासन वेळोवेळी आणखी जे कोणतेही नियंत्रण निर्दिष्ट करील ते नियंत्रण राहील.

या अधिनियमान्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यांवर [१][आयुक्तांचे] नियंत्रण.

**५.** या अधिनियमान्वये अधिकार दिलेले सर्व अधिकारी हे, ह्या अधिनियमाच्या तरतुदी किंवा तदन्वये केलेले नियम किंवा दिलेले आदेश यान्वये आपले अधिकार चालविताना व आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, [१][आयुक्ताच्या] हाताखाली असतील व त्याचे त्यांच्यावर नियंत्रण राहील व त्यांस तो वेळोवेळी जे आदेश देईल ते पाळणे भाग पडेल.

ज्या औषधिद्रव्यांस हा अधिनियम लागू असेल अशी औषधिद्रव्ये व अधिसूचित औषधिद्रव्ये.

**६.** (१) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणतेही औषधिद्रव्य हे ज्यास हा अधिनियम लागू आहे असे औषधिद्रव्य असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार आहे.

---

१. सन १९५३ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूचीद्वारे 'संचालक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) एखादे औषधिद्रव्य आरोग्यास अपायकारक होईल अशा रीतीने त्याचा उपयोग करण्यात येत आहे अशी राज्य शासनाची खात्री झाल्यास, त्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे औषधिद्रव्य हे अधिसूचित औषधिद्रव्य आहे असे निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे.

अधिसूचित औषधिद्रव्यांच्या घाऊक व्यापाऱ्याच्या किंवा किरकोळ व्यापाऱ्याच्या धंद्याचे नियमन करणे.

७. राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत जो दिनांक ठरवील अशा दिनांकापासून, कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमान्वये कलेक्टरने दिलेल्या लायसन अटी व शर्ती यान्वये व तदनुसार असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याच्या घाऊक व्यापाऱ्याचा किंवा किरकोळ व्यापाऱ्याचा धंदा चालविता कामा नये.

किरकोळ व्यापाऱ्याने विक्री करणे.

८. कोणत्याही लायसन दिलेल्या किरकोळ व्यापाऱ्याने कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य लायसन दिलेल्या घाऊक व्यापाऱ्याकडून मिळविले नसेल तर, त्याने असे औषधिद्रव्य विकता कामा नये.

वैद्यक व्यवसायी व कलम १४ अन्वये अधिकृत केलेली व्यक्ती यांस विक्री करण्याचा व्यापाऱ्याचा अधिकार, वैद्यक व्यवसायीने विक्री करणे.

९. (१) कलम १० च्या तरतुदीस अधीन राहून, व्यापाऱ्यास कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य वैद्यक व्यवसायी यास किंवा कलम १४ अन्वये अधिकृत केलेली व्यक्ती यास विकण्याचा अधिकार आहे.

(२) कोणत्याही वैद्यक व्यवसायीने कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य व्यापाऱ्याकडून मिळविले नसेल तर, त्याने असे औषधिद्रव्य विकता कामा नये.

व्यापाऱ्याने करावयाच्या विक्रीचे कमाल परिमाण.

१०. कोणत्याही व्यापाऱ्याने कोणत्याही एका व्यवहारात, कोणत्याही व्यक्तीस, घाऊक किंवा किरकोळ विक्रीने, कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या कारणासाठी ठरवील अशा परिमाणापेक्षा किंवा परिमाणांपेक्षा अधिक विकता कामा नये :

परंतु, अधिसूचित औषधिद्रव्य ज्या कमाल परिमाणापर्यंत विकता येईल ते परिमाण ठरविताना राज्य शासनाला, निरनिराळ्या अधिसूचित औषधिद्रव्याच्या विक्रीबाबत आणि घाऊक व्यापारी व किरकोळ व्यापारी यांच्या निरनिराळ्या वर्गांनी निरनिराळ्या व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या निरनिराळ्या वर्गास करावयाच्या विक्रीच्या संबंधात निरनिराळी कमाल परिमाणे ठरविण्याचा अधिकार आहे.

**११.** (१) लायसन दिलेल्या किरकोळ व्यापाऱ्याने त्याच्या ताब्यातील कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य (वैद्यक व्यवसायी किंवा कलम १४ अन्वये योग्य रीतीने अधिकृत केलेली व्यक्ती नसेल अशा) कोणत्याही व्यक्तीस खऱ्याखुऱ्या औषधीय कारणाव्यतिरिक्त इतर कारणांकरिता, व वैद्यक व्यवसायीने दिलेल्या चिकित्सापत्रांनुसार असेल त्या व्यतिरिक्त, पुरविता कामा नये.

लायसन दिलेल्या किरकोळ व्यापाऱ्याने व वैद्यक व्यवसायीने औषधीय कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी व चिकित्सा-पत्रानुसार असेल त्या व्यतिरिक्त अधिसूचित औषधिद्रव्य विकता कामा नये.

(२) वैद्यक व्यवसायीने त्याच्या ताब्यातील कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य कोणत्याही व्यक्तीस खऱ्याखुऱ्या औषधीय कारणांव्यतिरिक्त इतर कारणाकरिता, व त्याने स्वत: किंवा इतर वैद्यक व्यवसायीने दिलेल्या चिकित्सापत्रांनुसार असेल त्या व्यतिरिक्त पुरविता कामा नये.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) च्या कारणांकरिता दिलेले कोणतेही चिकित्सापत्र किंवा त्याच्या प्रती व इतर कागदपत्र ही विहित करण्यात येतील अशा रीतीने व विहित करण्यात येईल अशा मुदतीपर्यंत जपून ठेवली पाहिजेत.

१२. (१) कलम १४ च्या तरतुदीस अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीने,--

अधिसूचित औषधिद्रव्य ताब्यात ठेवण्याचे नियमन.

(क) (१) तो व्यापारी असल्यास, कोणत्याही एका वेळी किंवा राज्य शासन निर्दिष्ट करील अशा एका किंवा अनेक मुदतीत, किंवा

(२) तो वैद्यक व्यवसायी असल्यास, कोणत्याही एका वेळी, कलेक्टरची लेखी व आगाऊ परवानगी असल्याशिवाय,

राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत ठरवील अशा परिमाणापेक्षा किंवा परिमाणांपेक्षा अधिक प्रमाणात कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य आपल्या ताब्यात ठेवता कामा नये;

(ख) तो व्यापारी किंवा वैद्यक व्यवसायी नसल्यास, राज्य शासनाने याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या परवान्यान्वये असेल त्या व्यतिरिक्त, त्याच्या स्वत:च्या किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या खऱ्याखुऱ्या औषधीय उपयोगासाठी चिकित्सापत्रांनुसार कोणत्याही एका वेळी तयार करून देण्यांत किंवा विकण्यात आले असेल अशा परिमाणांपेक्षा अधिक प्रमाणात कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य आपल्या ताब्यात ठेवता कामा नये : परंतु राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून राज्यात प्रवेश करणाऱ्या व त्याच्या स्वत:च्या किंवा त्याच्याबरोबर असलेल्या त्याच्या कुटुंबांतील व्यक्तींच्या खऱ्याखुऱ्या औषधीय उपयोगासाठी कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य जवळ बाळगणाऱ्या प्रवाशास या खंडातील कोणताही मजकूर लागू होणार नाही.

(२) या कलमान्वये अधिसूचित औषधिद्रव्य ज्या कमाल परिमाणापर्यंत जवळ बाळगता येईल ते परिमाण ठरविताना राज्य शासनाला, निरनिराळी अधिसूचित औषधिद्रव्ये जवळ बाळगण्याच्या बाबतीत, आणि घाऊक व्यापारी व किरकोळ व्यापारी यांच्या निरनिराळ्या वर्गांनी ती जवळ बाळगण्याच्या बाबतीत, निरनिराळी कमाल परिमाणे ठरविण्याचा अधिकार आहे.

**अधिसूचित औषधिद्रव्याच्या वाहतुकीचे नियमन.**

**१३.** या कलमाच्या व कलम १४ च्या तरतुदीस अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीने,--

(क) तो व्यापारी असल्यास, राज्य शासनाने याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या पासानुसार असेल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याची वाहतूक करता कामा नये;

(ख) वैद्यक व्यवसायी असल्यास, त्यास कलम १२, पोट-कलम (१) याच्या खंड (अ) च्या तरतुदीन्वये जे परिमाण जवळ बाळगण्याची त्यास परवानगी देण्यात आली असेल त्या परिमाणांपेक्षा अधिक प्रमाणात कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याची वाहतूक करता कामा नये;

(ग) व्यापारी किंवा वैद्यक व्यवसायी यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्ती असल्यास, राज्य सरकारने याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या पासानुसार असेल त्या व्यतिरिक्त, त्याच्या स्वत:च्या किंवा त्याच्या कुटुंबांतील व्यक्तींच्या खऱ्याखुऱ्या औषधीय उपयोगासाठी चिकित्सापत्रानुसार कोणत्याही एकावेळी तयार करून देण्यात किंवा विकण्यात आले असेल अशा परिमाणापेक्षा अधिक प्रमाणात कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याची वाहतूक करता कामा नये :

परंतु, या कलमातील कोणताही मजकूर,--

(क) राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून राज्यात प्रवेश करणाऱ्या व त्याच्या स्वत:च्या किंवा त्याच्या बरोबर असलेल्या त्याच्या कुटुंबांतील व्यक्तीच्या खऱ्याखुऱ्या औषधीय उपयोगासाठी कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य जवळ बाळगणाऱ्या प्रवाशास, किंवा

(ख) कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याच्या, [1][महाराष्ट्र राज्याबाहेरील] कोणत्याही ठिकाणाहून राज्याबाहेरील दुसऱ्या ठिकाणी आरपार होणाऱ्या वाहतुकीस,

लागू होणार नाही.

**विवक्षित व्यक्तींनी अधिसूचित औषधिद्रव्ये जवळ बाळगणे किंवा त्यांची वाहतूक करणे यांचे नियमन.**

**१४.** कलम १२ किंवा १३ मध्ये काहीही असले तरी, कलेक्टरला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे,--

(क) रुग्णालय किंवा दवाखाना यांचा ताबा असणाऱ्या किंवा त्यांची व्यवस्था पाहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस;

(ख) शैक्षणिक संस्थेचा ताबा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, केवळ शैक्षणिक कारणांसाठी उपयोग करण्यासाठी;

(ग) शास्त्रीय संशोधन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, केवळ शास्त्रीय संशोधनाकरिता उपयोग करण्यासाठी;

(घ) वैमानिकास, विमानात निकडीच्या प्रसंगी उपयोग करण्यासाठी;

(ङ) रुग्णवाहक किंवा प्रथमोपचार केंद्र किंवा प्रथमोपचार पेटी यांचा ताबा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, निकडीच्या प्रसंगी उपयोग करण्यासाठी;

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० यान्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(च) कोणत्याही रासायनिक औषधे विकणाऱ्या व्यक्तीस, एखाद्या औषधीचे घटकद्रव्य म्हणून त्या औषधीत वापरण्यासाठी;

(छ) एखादी औषधी तयार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, ती तयार करताना वापरण्यासाठी;

कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य, अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रमाणात, अशा रीतीने आणि अशा शर्तीस अधीन राहून, जवळ बाळगण्यास किंवा त्याची वाहतूक करण्यास अधिकृत करण्याचा अधिकार आहे.

**कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्याच्या वतीने अधिसूचित औषधिद्रव्य विकणे, ताब्यात ठेवणे व त्याची वाहतूक करणे.**

१५. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही इतर व्यक्तीच्या वतीने कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य विकले असेल, ताब्यात ठेवले असेल किंवा त्याची वाहतूक केली असेल आणि जेव्हा अशा दुसऱ्या व्यक्तीस, असे विकणे, ताब्यात ठेवणे किंवा अशी वाहतूक करणे आपल्या वतीने झाले आहे हे माहीत असेल किंवा तसे वाटण्यास त्यास कारण असेल तेव्हा असे अधिसूचित औषधिद्रव्य हे, ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता अशा दुसऱ्या व्यक्तीने सुद्धा विकले आहे, ताब्यात ठेवले आहे किंवा त्याची वाहतूक केली आहे असे समजले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही तरतुदीमुळे असे अधिसूचित औषधिद्रव्य अवैधरीत्या विकणे, ताब्यात ठेवणे किंवा त्याची वाहतूक करणे याबद्दल या अधिनियमान्वये कोणतीही व्यक्ती ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र असेल त्यातून ती मुक्त होणार नाही.

**नमुना म्हणून केलेली अधिसूचित औषधिद्रव्याची विक्री, वगैरेचे नियमन.**

१६. नमुन्याच्या कारणाकरिता विहित करण्यात येईल अशा प्रमाणाहून अधिक नसणाऱ्या कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याची खरोखरीच्या एखाद्या रासायनिक औषधी विकणाऱ्या व्यक्तीने, औषधिद्रव्य विकणाऱ्याने किंवा ते तयार करणाऱ्या व्यक्तीने किंवा त्याने याबाबतीत योग्य रीतीने अधिकृत केलेल्या त्याच्या नोकराने अथवा अभिकर्त्याने आपल्या धंद्याच्या सर्वसाधारण क्रमात विक्री करण्यास, असे औषधिद्रव्य ताब्यात ठेवण्यास किंवा त्याची वाहतूक करण्यास या अधिनियमातील कोणतीही तरतूद लागू असणार नाही.

**विक्रीच्या बाबतीत विक्रीचे ज्ञापन देणे.**

१७. (१) कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य विकताना प्रत्येक व्यापाऱ्याने विक्रीचा तपशील असलेले विक्रीचे ज्ञापन खरेदीदारास दिले पाहिजे आणि अशा ज्ञापनाच्या दुसऱ्या प्रतीवर खरेदीदाराची सही घेतली पाहिजे.

(२) राज्य शासनास, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, अशा विक्रीच्या ज्ञापनात आणि त्याच्या दुसऱ्या प्रतीत द्यावयाचा इतर तपशील विहित करण्याचा अधिकार आहे.

**लायसन वगैरे तहकूब किंवा रद्द करण्याचा अधिकार.**

१८. (१) (क) या अधिनियमान्वये मंजूर केलेले किंवा दिलेले लायसन, परवाना किंवा पास धारण करणाऱ्या व्यक्तीने द्यावयाची कोणतीही फी योग्य रीतीने दिली नाही तर;

(ख) असे लायसन, परवाना किंवा पास धारण करणाऱ्या व्यक्तीने किंवा त्याच्या नोकराने किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने असे लायसन, परवाना किंवा पास याच्या कोणत्याही अटींचा किंवा शर्तींचा भंग केला तर;

१९४९ चा मुंबई २५. १९३० चा २. १९४० चा २३.

(ग) असे लायसन, परवाना किंवा पास धारण करणाऱ्या व्यक्तीस किंवा त्याच्या नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा तो धारण करणाऱ्या व्यक्तीस मुंबई मद्यनिषेध अधिनियम, १९४९, किंवा अपायकारक औषधिद्रव्यांबाबत अधिनियम, १९३० किंवा औषधिद्रव्यांबाबत अधिनियम, १९४० या खालील अपराध केल्याबद्दल दोषी ठरविण्यात आले तर,

ह्या अधिनियमान्वये मंजूर केलेले किंवा दिलेले लायसन, परवाना किंवा पास धारण करणाऱ्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, कलेक्टर यास असे लायसन, परवाना किंवा पास आवश्यक असेल अशा मुदतीपर्यंत, तहकूब करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अधिकार आहे.

(२) जर लायसन, परवाना किंवा पास कोणत्याही कारणावरून तहकूब किंवा रद्द करण्यात आला असेल तर तो धारण करणाऱ्या व्यक्तीस, अशा रीतीने तहकूब किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई मिळण्याच्या किंवा त्याबाबतीत दिलेली कोणतीही फी परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

(३) (क) ज्या कोणत्याही व्यक्तीस ह्या अधिनियमान्वये दिलेले लायसन, परवाना किंवा पास पूर्वी तहकूब किंवा रद्द करण्यात आला असेल तर; किंवा

१९४९ चा मुंबई २५. १९३० चा २. १९४० चा २३.

(ख) ज्या कोणत्याही व्यक्तीस, ह्या अधिनियमान्वये किंवा मद्यनिषेध अधिनियम, १९४९ अन्वये किंवा अपायकारक औषधिद्रव्यांबाबत अधिनियम, १९३० अन्वये किंवा औषधिद्रव्यांबाबत अधिनियम, १९४० अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध केल्याबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल तर

अशा कोणत्याही व्यक्तीस लायसन, परवाना किंवा पास देण्याचे नाकारण्याचा कलेक्टर यास अधिकार आहे.

(४) तसेच कलेक्टर यास पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती ज्या पेढीचा भागीदार असेल अशा कोणत्याही पेढीस किंवा अशा व्यक्तीचा धंदा ज्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, लायसन, परवाना किंवा पास देण्याचे नाकारण्याचाही अधिकार आहे.

तरतुदींचे पालन करण्यात कसूर करणे.

**१९.** कोणत्याही व्यक्तीने जाणूनबुजून,--

(क) कोणतीही खोटी माहिती देता कामा नये; किंवा

(ख) ह्या अधिनियमान्वये किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांन्वये किंवा दिलेल्या आदेशान्वये त्याच्याकडून वैधरीत्या मागितलेली कोणतीही माहिती देण्याचे नाकारता कामा नये; किंवा

(ग) कोणतेही पुस्तक, नोंदणीपुस्तक लायसन, परवाना, पास किंवा इतर लेख यात असलेली कोणतीही माहिती प्रकट होण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, त्यामधील नोंदी रद्द करून त्यात फेरफार करता कामा नये किंवा अन्यथा त्यांचा नाश करता कामा नये किंवा ते फाडता किंवा खराब करता कामा नये.

**२०.** [1][आयुक्त] किंवा कलेक्टर किंवा राज्य शासनाने याबाबतीत अधिकार दिलेला कोणताही अधिकारी यांस, आदेशाद्वारे, कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशी कोणत्याही औषधिद्रव्यांबाबत त्याचेजवळ असलेली कोणतीही माहिती, कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस पुरविण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार आहे. माहिती मिळविण्याचा अधिकार.

**२१.** (१) जी कोणी व्यक्ती ह्या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे किंवा त्यान्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचे किंवा त्यान्वये दिलेल्या लायसनच्या, परवान्याच्या किंवा पासाच्या कोणत्याही अटींचे किंवा शर्तीचे उल्लंघन करील किंवा ह्या अधिनियमान्वये दिलेल्या अधिकारान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात कसूर करील त्यास, दोषसिद्धीनंतर,-- शास्ती

(१) पहिल्या अपराधाबद्दल, एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयापर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल:

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असता कामा नये व असा द्रव्यदंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असता कामा नये;

(२) दुसऱ्या अपराधाबद्दल, दोन वर्षे मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची कैदेची शिक्षा होईल व दोन हजार रुपये द्रव्यदंडाची शिक्षा होईल:

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी अशी कैदेची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असता कामा नये व असा दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असता कामा नये;

(३) तिसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल, तीन वर्षे मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा होईल व पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल:

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी अशी कैदेची शिक्षा एक वर्षापेक्षा कमी असता कामा नये व असा दंड दोन हजार पाचशे रुपयांहून कमी असता कामा नये.

(२) या अधिनियमान्वये मंजूर करण्यात आलेले कोणतेही लायसन, परवाना किंवा पास धारण करणाऱ्या व्यक्तीने किंवा, त्याच्या नोकराचे किंवा, त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने, त्याच्या वतीने, काम करणाऱ्या, कोणत्याही व्यक्तीने अशा लायसनच्या, परवान्याच्या किंवा पासाच्या शर्तीपैकी किंवा अटींपैकी कोणत्याही शर्तीचे किंवा अटींचे उल्लंघन केले असेल अशा बाबतीत, अशी धारण करणारी व्यक्ती ही अशा कोणत्याही उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व योग्य आणि वाजवी दक्षता घेतली होती असे सिद्ध करण्यात आल्याशिवाय, त्यास मंजूर करण्यात आलेले लायसन, परवाना किंवा पास रद्द किंवा तहकूब करण्यात येऊन ती, दोषी ठरली असता, सहा महिने मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कैदेच्या शिक्षेस किंवा पाचशे रुपये द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

असे कोणतेही उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, मग तिने लायसन, परवाना किंवा पास धारण करणाराच्या परवानगीने किंवा अशा परवानगीशिवाय कृत्य केलेले असो वा नसो, त्याच शिक्षेस पात्र ठरेल.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५२, कलम ३, याच्या अनुसूचीद्वारे 'संचालक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कंपन्यांनी केलेले अपराध.

२२. (१) जर या अधिनियमाखालील अपराध करणारी व्यक्ती एखादी कंपनी असेल तर, अशी कंपनी तसेच तो अपराध घडला त्यावेळी कंपनी ज्या व्यक्तीच्या स्वाधीन होती, व कंपनीचे कामकाज चालविण्यास जी जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती ही त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजले जाईल व तिच्या विरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, जर कोणतीही व्यक्ती, तो अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध करील तर, या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल व तो अपराध कंपनीच्या कोणताही संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याने उपेक्षा केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध होईल तर, असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजले पाहिजे व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**--ह्या कलमाच्या कारणाकरिता,--

(क) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ एक व्यक्तिभूत संस्था असा समजावा व तीत पेढीचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो, आणि

(ख) एखाद्या पेढीच्या संबंधात "संचालक" या संज्ञेचा अर्थ त्या पेढीतील भागीदार असा समजावा.

अधिक शिक्षा देण्याचा फौजदारी न्यायाधीशाचा अधिकार.

२३. *दंड प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम ३२ मध्ये काहीही असले तरी कोणत्याही प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाने किंवा राज्य शासनाने याबाबतीत विशेष रीतीने अधिकार दिलेल्या पहिल्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशाने उक्त संहितेच्या कलम ३२ अन्वये त्यास असलेल्या अधिकाराहून अधिक अशी कलम २१ अन्वये जी शिक्षा देण्याचा त्यास अधिकार दिला असेल अशी कोणतीही शिक्षा देणे हे विधिसंमत असेल.

जप्त होण्यास पात्र असलेल्या वस्तू.

२४. जेव्हा जेव्हा ह्या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध करण्यात आला असेल तेव्हा तेव्हा.--

(क) ज्याच्या संबंधात अपराध करण्यात आला असेल असे कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य,

(ख) ज्याच्या संबंधात अपराध करण्यात आला असेल अशा अधिसूचित औषधिद्रव्यासहित किंवा त्याशिवाय आणखी वैधरीत्या वाहतूक करण्यात आलेले किंवा अपराध्याच्या ताब्यात असलेले कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य,

(ग) खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य ज्यात आढळून आले आहे अशी पात्रे, संवेष्टने व वेष्टने आणि अशा पात्रांतील, संवेष्टनांतील व वेष्टनांतील कोणत्याही इतर वस्तू आणि असे कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य वाहून नेण्यासाठी वापरण्यात आलेली जनावरे, गाड्या, जलयान किंवा इतर वाहने, ही जप्त होण्यास पात्र असतील.

---

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहावा.

**२५.** (१) ह्या अधिनियमाखालील अपराधाचा खटला चालू असताना, कोणतीही वस्तू कलम २४ अन्वये जप्त होण्यास पात्र आहे असा न्यायालयाने निर्णय दिल्यास, त्यास, अशा वस्तूंवर हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावर आणि आपल्या हक्काच्या समर्थनार्थ तो जो कोणताही साक्षीपुरावा हजर करील तो ऐकून घेतल्यानंतर अशी वस्तु जमा करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार आहे किंवा अधिसूचित औषधिद्रव्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तूंच्या बाबतीत, न्यायालयास जप्तीऐवजी, त्यास योग्य वाटेल इतका दंड भरण्याविषयी अशा मालकास मुभा देण्याचा अधिकार आहे : जप्तीच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती.

परंतु, कोणत्याही जनावराच्या, गाडीच्या, जलयानाच्या, वाहनाच्या किंवा इतर वाहतुकीच्या साधनाच्या मालकाने, आपण गुन्हा घडू नये यासाठी वाजवी काळजी घेतली होती अशी न्यायालयाची खात्री करून दिली तर, असे जनावर, गाडी, जलयान किंवा इतर वाहन जप्त करता कामा नये.

(२) या अधिनियमाखालील एखादा अपराध करण्यात आला असेल आणि अपराधी माहीत नसेल किंवा सापडणे शक्य नसेल किंवा या अधिनियमान्वये जप्त करण्यास पात्र असलेली कोणतीही वस्तु सापडली असेल किंवा धरण्यात आली असेल तेव्हा [१][आयुक्तास], कलेक्टरास किंवा राज्य शासन याबाबत अधिकृत करील अशा कोणत्याही इतर अधिकाऱ्यास चौकशी करण्याचा अधिकार आहे; आणि अशी चौकशी केल्यानंतर, अपराध करण्यात आला आहे अशी त्याची खात्री होईल तर, त्यास, सापडलेली वस्तु जप्त करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार आहे :

परंतु, अशी वस्तु सापडल्याच्या किंवा धरल्याच्या तारखेपासून एक महिन्याची मुदत संपण्यापूर्वी किंवा अशा वस्तूवर कोणताही हक्क सांगणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावाचून आणि आपल्या हक्काच्या समर्थनार्थ तो जो कोणताही साक्षीपुरावा हजर करील तो ऐकून घेतल्यावाचून, असा कोणताही आदेश देता कामा नये.

(३) जेव्हा या कलमान्वये सापडलेली किंवा धरण्यात आलेली कोणतीही वस्तु त्वरित व स्वाभाविकरीत्या नाश पावण्याजोगी असेल किंवा तिची विक्री करणे मालकाच्या हिताचे आहे असे न्यायालयाचे [१][आयुक्ताचे], कलेक्टरचे किंवा राज्य शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे मत होईल तर त्यास, अशी वस्तु विकण्याविषयी कोणत्याही वेळी निदेश देण्याचे अधिकार आहे; आणि या कलमाच्या तरतुदी जेथवर शक्य असेल तेथवर, विक्री करून आलेल्या निव्वळ रकमेच्या बाबतीत लागू होतील :

परंतु, त्वरित व स्वाभाविकरीत्या नाश पावण्याजोग्या कोणत्याही वस्तूच्या बाबतीत प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार करता अशी वस्तु नष्ट करणे इष्ट आहे असे न्यायालयाचे किंवा संबंधित अधिकाऱ्याचे मत झाल्यास, ती नष्ट करण्याविषयी आदेश देण्याचा त्यास अधिकार आहे.

**२६.** (१) या अधिनियमाच्या कारणासाठी [१][आयुक्तास] राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची किंवा अधिकाऱ्यांची, त्यास नेमून देण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रात निरीक्षक म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे. निरीक्षक आणि कार्यपद्धती.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची चौकशी पोट-कलम (१) अन्वये नेमण्यात आलेल्या निरीक्षकाखेरीज, कुणीही करता कामा नये.

---

१. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ याच्या अनुसूचीद्वारे 'संचालकास' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

मंजुरीशिवाय खटला करता कामा नये.

**२७.** [1][ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नियुक्ती करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात पोलीस आयुक्ताच्या] आणि इतरत्र जिल्हा फौजदारी न्यायाधीशाच्या आगाऊ मंजुरीशिवाय, त्या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल कोणताही खटला दाखल करता कामा नये.

झडती घेण्याचा व जप्ती करण्याचा अधिकार.

**२८.** ज्या जागेत या अधिनियमाखालील एखादा अपराध करण्यात आला आहे किंवा केला जात आहे किंवा केला जाण्याचा संभव आहे असे निरीक्षकास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा व झडती घेण्याचा त्यास अधिकार आहे, आणि या अधिनियमान्वये जी जप्तीस पात्र आहेत असे त्यास सकारण वाटेल अशी कोणतीही अधिसूचित औषधिद्रव्ये व इतर वस्तू तसेच जो कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तू ह्या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केल्याचा पुरावा म्हणून सादर करता येईल असे त्यास सकारण वाटत असेल असा दस्तऐवज किंवा इतर वस्तू जप्ती करण्याचा त्यास अधिकार आहे; आणि ज्या व्यक्तीने या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा व्यक्तीस अटकावून ठेवण्याचा आणि त्याची झडती घेण्याचा त्यास अधिकार आहे.

झडती घेण्याचा व खुल्या जागेत अधिसूचित औषधिद्रव्ये वगैरे जप्ती करण्याचा अधिकार.

**२९.** निरीक्षकास किंवा राज्य शासनाने याबाबतीत अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस,--

(क) या अधिनियमान्वये जे जप्त होण्यास पात्र आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य किंवा इतर कोणतीही वस्तू कोणत्याही खुल्या जागेत किंवा त्याची ने-आण करताना धरण्याचा अधिकार आहे;

(ख) कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, अशा व्यक्तीस अटकावून ठेवण्याचा आणि त्याची झडती घेण्याचा अधिकार आहे, आणि या अधिनियमान्वये जे जप्त होण्यास पात्र आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्यं किंवा इतर कोणतीही वस्तू जर अशा व्यक्तीजवळ असेल तर ती जप्ती करण्याचा अधिकार आहे.

झडती घेण्याची व जप्ती करण्याची कार्यपद्धती.

३०. *दंड प्रक्रिया संहिता, १८९८ च्या तरतुदी ह्या उक्त संहितेच्या कलम ९८ अन्वये काढलेल्या अधिपत्राच्या अधिकारान्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीस किंवा जप्तीस त्या जशा लागू असतील त्याचप्रमाणे जेथवर लागू करणे शक्य असेल तेथवर या अधिनियमाखालील कोणत्याही झडतीस किंवा जप्तीस लागू असतील. सन १८९८ चा ५.

लायसन दिलेल्या व्यापाऱ्याच्या जागेची तपासणी करण्याचा अधिकार.

३१. (१) [2][आयुक्त] किंवा कलेक्टर किंवा याबाबत राज्य शासनाने योग्य रीतीने अधिकार दिलेला कोणताही अधिकार यांस,--

(क) कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा अशा व्यापाऱ्याच्या नोकरीत असलेल्या व्यक्तीला किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीला तो या अधिनियमान्वये दिलेल्या ज्या लायसनच्या आधारे अधिसूचित औषधिद्रव्याच्या घाऊक किंवा किरकोळ विक्रीचा धंदा करीत असेल, लायसन हजर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे;

---

[1] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम २ अन्वये 'बृहन्मुंबईत पोलीस कमिशनरच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ याच्या अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहावे.

(ख) ज्या कोणत्याही दुकानात किंवा जागेत, व्यापारी किंवा वैद्यक व्यवसायी अधिसूचित औषधिद्रव्ये साठवीत असेल किंवा विकीत असेल किंवा तयार करीत असेल अशा दुकानात किंवा जागेत दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी, प्रवेश करण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार आहे आणि अशा कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्याचा साठा तपासण्याचा, त्याची परीक्षा करण्याचा, मापण्याचा किंवा त्याचे वजन करण्याचा किंवा असा कोणताही साठा तपासण्याची, त्याची परीक्षा करण्याची, तो मोजण्याची किंवा त्याचे वजन करण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार आणि त्या कारणासाठी त्या संबंधात केलेल्या नियमानुसार त्याचा नमुना (त्याबद्दलची किंमत दिल्यावर) घेण्याचा अधिकार आहे.

(२) या अधिनियमान्वये दिलेले लायसन धारण करणारी व्यक्ती किंवा असे लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीच्या नोकरीत असलेली व्यक्ती किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणारी व्यक्ती या अधिनियमान्वये अपराध असलेले कोणतेही कृत्य बुद्ध्या करीत आहे किंवा जे करण्याचे वगळल्यामुळे या अधिनियमान्वये अपराध होतो असे कोणतेही कृत्य करण्याचे वगळीत आहे असे अशा अधिकाऱ्यास आढळून येईल तर, त्यास, ज्याच्या संबंधात असा अपराध करण्यात आला असेल अशा कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्यांचा साठा धरण्याचा अधिकार आहे. तसेच त्यास अशा गोष्टींसंबंधीचे प्रतिवृत्त ताबडतोब आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर, अशा अधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना केली पाहिजे.

**३२.** (१) कलेक्टर किंवा [1][आयुक्त] यांच्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या सर्व आदेशांवर तक्रारींचा विषय असलेला आदेश दिल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, कोणत्याही वेळी कलेक्टरकडे अपील करता येईल. अपिले

(२) कलेक्टर आणि [1][आयुक्त] यांनी दिलेल्या सर्व आदेशांवर, अनुक्रमे [1][आयुक्त] व राज्य शासनाकडे तक्रारीचा विषय असलेला आदेश दिल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत, कोणत्याही वेळी अपील करता येईल :

१८९८ ५. परंतु, [1][आयुक्त] अपिलात दिलेल्या आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.

(३) मागील तरतुदींस अधीन राहून, या कलमान्वये अपिलांचा निर्णय देताना, कलेक्टर व [1][आयुक्त] यांनी विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरली पाहिजे.

**३३.** (लायसन, परवाना किंवा पास देण्यासंबंधीचे किंवा नाकारण्यासंबंधीचे कामकाज धरून) या अधिनियमान्वये कोणताही अधिकार चालविणाऱ्या किंवा कोणतेही कर्तव्य बजावणाऱ्या किंवा काम पार पाडणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामकाजाचे कागदपत्र, अशा कामकाजात दिलेल्या कोणत्याही आदेशाचा बिनचूकपणा, वैधता किंवा औचित्य याविषयी, तसेच असे कामकाज व्यवस्थित रीतीने चालविण्यात आले होते किंवा कसे याविषयी स्वत:ची खात्री करून घेण्यासाठी मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा राज्य शासनास अधिकार आहे; आणि त्यास, योग्य वाटेल त्याप्रमाणे असा आदेश रद्द करण्याचा, फिरविण्याचा, त्यात फेरफार करण्याचा किंवा तो कायम करण्याचा अगर इतर आदेश देण्याचा अधिकार आहे. फेरतपासणी

---

१. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

कारवाई रण्यास मनाई.

**३४.** सरकारविरुद्ध किंवा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये अधिकार चालविण्यासाठी किंवा कर्तव्ये बजावण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा आशय असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणताही दावा किंवा कारवाई चालणार नाही.

तदायक ो प्रवेश झडती किंवा याबद्दल शिक्षा.

**३५.** जो कोणताही निरीक्षक किंवा राज्य शासनाने कलम २९ अन्वये अधिकार दिलेली व्यक्ती,-

(क) संशय घेण्यास वाजवी कारणे नसताना, कोणत्याही इमारतींत, जलयानात किंवा जागेत प्रवेश करील किंवा करवील, झडती घेईल किंवा घेववील;

(ख) कलम २४ अन्वये जप्त केले जाण्यास पात्र असलेले कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य किंवा इतर वस्तू धरण्याच्या किंवा त्यासाठी झडती घेण्याच्या सबबीवर अथवा कलम २८ किंवा २९ अन्वये जप्त केला जाण्यास पात्र असलेला कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तू धरण्याच्या सबबीवर कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता त्रासदायक रीतीने व निष्कारण धरील;

(ग) कोणत्याही व्यक्तीस त्रासदायक रीतीने व निष्कारण अटकावून ठेवील किंवा तिची झडती घेईल,

त्यास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

यांविरुद्ध वयाच्या टल्यांची किंवा दाव्यांची मुदत.

**३६.** या अधिनियमानुसार केलेल्या किंवा केल्याचा आरोप केलेल्या कोणत्याही कृत्यासंबंधी कोणताही अधिकारी किंवा या अधिनियमान्वये अधिकार चालविण्यासाठी किंवा कर्तव्ये बजावण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी अधिकार दिलेली कोणतीही व्यक्ती याजवर भरावयाचे सर्व खटले व सरकारविरुद्ध किंवा उपरोक्त कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध वैध रीत्या करावयाच्या सर्व कारवाया, तक्रारीचा विषय असलेले कृत्य, केल्याच्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत दाखल केल्या पाहिजेत. त्यानंतर दाखल करता कामा नये; आणि अशी कोणतीही कारवाई पुढील बाबतीत काढून टाकली पाहिजे :–

(क) या अधिनियमान्वये किंवा तदन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिन्वये करता आली असती अशी जी अपिले व फेरतपासणीसाठीचे जे अर्ज उपरोक्त चार महिन्यांच्या मुदतीत करता येणे शक्य होते ती सर्व अपिले व ते सर्व अर्ज अशी कारवाई दाखल करण्यापूर्वी त्याने दाखल केले होते असे वादीने सिद्ध केले नाही तर; किंवा

(ख) नुकसानीबद्दल केलेल्या कारवाईच्या बाबतीत, कारवाई दाखल करण्यापूर्वीच भरपाईची पुरेशी रक्कम दिलेली असेल तर किंवा कारवाई दाखल केल्यानंतर प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने न्यायालयात खर्चासह पुरेशी रक्कम भरण्यात आली तर.

राज्य ासनाचे ाधारण धिकार.

**३७.** हा अधिनियम किंवा त्यान्वये केलेले नियम, काढलेल्या अधिसूचना किंवा दिलेले आदेश यात काहीही असले तरी, राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे--

(क) त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटतील अशा शर्तींना अधीन ठेवून, कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास, किंवा कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास, अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींच्या, किंवा त्यान्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा आदेशांच्या कक्षेतून अथवा दिलेले लायसन, परवाना किंवा पास यांच्या कोणत्याही शर्तींच्या कक्षेतून वगळणे;

(ख) कोणत्याही क्षेत्रात अशा आदेशात निर्दिष्ट केलेले कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य ज्या जागी विकता येईल त्या जागांची संख्या विहित करणे;

(ग) कोणतेही लायसन, पास किंवा परवाना देण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे;

(घ) ज्या व्यक्तीस किंवा वर्गातील व्यक्तीस या अधिनियमान्वये लायसन, परवाने किंवा पास देण्यात यावेत किंवा देण्यात येऊ नयेत त्या व्यक्ती किंवा ते वर्ग निर्दिष्ट करणे;

(ङ) त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमान्वये लायसन, परवाने किंवा पास देण्यासंबंधीच्या कोणत्याही गोष्टीबाबत किंवा त्यांच्याशी अन्य प्रकारे संबंध असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत इतर अनुदेश देणे;

(च) आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत किंवा अशा शर्तीनुसार असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्यांची विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध करणे;

(छ) अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा व्यापाऱ्यांच्या वर्गास व निर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रमाणात कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य विकण्याविषयी निदेश देणे;

(ज) या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधात जे निदेश देणे त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल, असे आणखी निदेश देणे.

**अधिकार सोपविणे.**

**३८.** राज्य शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, या अधिनियमान्वये त्याने, [१][आयुक्ताने] किंवा कलेक्टरने चालवावयाचे कोणतेही अधिकार, अधिसूचनेत ज्या कोणत्याही शर्ती निर्दिष्ट केल्या असतील त्यास अधीन राहून, या बाबतीत राज्य शासनाने विशेष रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याससुद्धा चालविता येतील.

**ह्या अधिनियमाच्या तरतुदी राज्य शासनाच्या मालकीच्या अधिसूचित औषधिद्रव्यांना लागू नसणे.**

**३९.** या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशात अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद करण्यात येईल ती खेरीजकरून या अधिनियमातील कोणताही मजकूर सरकारची मालमत्ता असलेल्या आणि त्याच्या कब्जात असलेल्या किंवा त्याच्यावतीने कब्जात ठेवलेल्या अधिसूचित औषधिद्रव्यांना लागू असणार नाही :

परंतु, अशी औषधिद्रव्ये ज्या कोणत्याही व्यक्तींस या अधिनियमाच्या तरतुदीन्वये किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशान्वये कब्जात ठेवण्याचा हक्क नसेल त्या व्यक्तीस ती विकता किंवा देता कामा नये.

---

१ सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ याच्या अनुसूचीद्वारे "संचालकाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नियम करण्याचा अधिकार.

**४०.** (१) या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनास नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषकरून व वरील अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तरतूद करता येईल :--

(क) ज्या रीतीने वैद्यक व्यवसायींनी व लायसन दिलेल्या किरकोळ व्यापाऱ्यांनी कलम ११ अन्वये चिकित्सापत्रे किंवा त्याच्या प्रती व इतर कागदपत्रे ठेवली पाहिजेत ती रीत व ज्या मुदतीपर्यंत ती जपून ठेवली पाहिजेत ती मुदत;

(ख) कलम १६ अन्वये नमुन्यासाठी अधिसूचित औषधिद्रव्याचे प्रमाण विहित करणे;

(ग) कलम १७ अन्वये विक्रीच्या ज्ञापनात आवश्यक असलेला इतर तपशील विहित करणे;

(घ) कलम ३१, पोट-कलम (१) चा खंड (ब) अन्वये ज्या रीतीने आणि ज्या शर्तीच्या अधीन राहून नमुने घेतले पाहिजेत ती रीत व त्या शर्ती आणि त्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे;

(ङ) कलम ३२ अन्वये अपिलांचा निर्णय करताना अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे;

(च) कोणत्याही क्षेत्रात ज्या जागी कोणतेही अधिसूचित औषधिद्रव्य विकता येईल त्या जागांची संख्या विहित करणे व लायसन, परवाने व पास देताना अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे;

(छ) अधिनियमान्वये दिलेली लायसने, परवाने किंवा पास यांचे नमुने व असे लायसन, परवाने किंवा पास ज्या अटींवर व शर्तींवर देता येतील त्या अटी व शर्ती विहित करणे तसेच, असे लायसन, परवाने किंवा पास यासाठी करावयाच्या अर्जांचे नमुने व त्या संबंधात द्यावयाची फी विहित करणे;

(ज) सामान्यत: व्यापाऱ्यांनी किंवा व्यापाऱ्यांच्या कोणत्याही वर्गाने, त्यांनी केलेल्या सर्व विक्रीच्या व खरेदीच्या व्यवहाराचे, किंवा त्यांच्या कब्जात असलेल्या अधिसूचित औषधिद्रव्यांच्या साठ्यांचे कागदपत्र व हिशेब ठेवणे व ते जपून ठेवणे;

(झ) कोणतेही व्यापारी किंवा कोणतेही वैद्यक व्यवसायी यांनी चालविलेल्या कोणत्याही धंद्यांच्या किंवा व्यवसायाच्या संबंधात त्यांना आवश्यक असलेली कोणतीही माहिती पुरविणे;

(ञ) लायसन धारण करणाऱ्या, पास धारण करणाऱ्या किंवा परवाना धारण करणाऱ्या व्यक्तीने किंवा वैद्यक व्यवसायीने ठेवावयाचे हिशेब व सादर करावयाची पत्रके विहित करणे;

(ट) कोणतेही व्यापारी किंवा वैद्यक व्यवसायी यांच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या अधिसूचित औषधिद्रव्यांसंबंधीच्या कोणत्याही हिशोबांच्या पुस्तकांची किंवा इतर दस्तऐवजांची तपासणी करणे;

(ठ) लायसन हस्तांतरित करण्याचे नियमन करणे किंवा त्यास प्रतिबंध करणे;

(ड) कोणत्याही अधिसूचित औषधिद्रव्यांच्या विक्रीबाबतच्या नोंदणीपुस्तकात खरेदीदाराचे नाव व पत्ता लिहिण्यास व त्याची सही घेण्यास भाग पाडणे;

(ढ) जप्त केलेल्या वस्तूंची विल्हेवाट लावणे;

(ण) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही गोष्ट.

(३) या कलमान्वये अधिकार चालवून नियम करण्यापूर्वी ते आगाऊ प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत:

परंतु, असे कोणतेही नियम ताबडतोब अंमलात आणले पाहिजेत असे राज्य शासनास वाटल्यास ते आगाऊ प्रसिद्ध न करता असे नियम करता येतील.

(४) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीसाठी ठेवले पाहिजेत आणि ते ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांस अधीन असतील.

१९५२ चा मुंबई २९. १९४९ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ४७, १९४९ चा सौराष्ट्र अध्यादेश ६१. १९५० चा २९.

रद्द करणे व बचाव.

**४१.** हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिवशी व त्या दिवसापासून, मुंबईचा औषधिद्रव्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९५२, मध्यप्रांत व वऱ्हाडचा औषधिद्रव्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४९, सौराष्ट्रचा औषधिद्रव्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अध्यादेश, १९४९ आणि मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला औषधिद्रव्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९५०, हे रद्द होतील :

परंतु ते अधिनियम अशा प्रकारे रद्द केल्यामुळे,--

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधीचा पूर्वीचा अंमल किंवा तदन्वये योग्यरीत्या केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट,

(ख) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधिन्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी, किंवा

(ग) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधिविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा, किंवा

(घ) उपरोक्त कोणताही हक्क विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा याबाबतची कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना, यास बाध येणार नाही किंवा बाध येतो असे समजले जाणार नाही;

आणि जणू हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा करता येईल;

तसेच मागील परंतुकास अधीन राहून, अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधिन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही उपाययोजना ही [तीत केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश किंवा निदेश, केलेला नियम किंवा नमुना किंवा दिलेले रोकड ज्ञापन (कॅश-मेमोरँडम) यांचा समावेश होतो], ह्या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, ती या अधिनियमाच्या तरतुदीन्वये केलेली गोष्ट किंवा उपाययोजना केलेली नेमणूक, काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश किंवा

निदेश, केलेला नियम किंवा नमुना किंवा दिलेले रोकड ज्ञापन आहे असे समजले पाहिजे व या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही उपाययोजनेद्वारे ती रद्द करण्यात आली नसेल तर किंवा रद्द करण्यात येईपर्यंत त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

इतर विधींचा बचाव.

**४२.** कलम ४१ च्या तरतुदीस अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिशिवाय आणखी असतील व त्यांच्यामुळे अशा विधीच्या तरतुदींचे अल्पीकरण होणार नाही.

PRINTED AT YERAVDA, PRISON, PRESS, PUNE - 411 006.